04-07-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 7/3/2025 10:41 PM Page 1



# कापड विक्रेत्यांच्या स्थलांतराला मान्यता

## मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपानंतर फोंडा नगरपरिषदेचा निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३ :** येथील जीर्ण झालेल्या मासळी बाजार इमारतीत दीर्घकाळ व्यवसाय करणाऱ्या कापड विक्रेत्यांना अखेर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्तक्षेपामुळे दिलासा मिळाला आहे. फोंडा पालिकेच्या गुरुवारी झालेल्या परिषदेच्या बैठकीत या विक्रेत्यांना न्यू मार्केट कॉम्प्लेक्सच्या मेझानाइन फ्लोअरमध्ये स्थलांतरित करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

यापूर्वी फोंडा नगरपालिकेने या विक्रेत्यांना जीर्ण झालेल्या इमारतीतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला होता. त्याऐवजी त्यांना पालिकेच्या मार्केटमध्ये स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव दिला गेला होता. मात्र, नवीन जागेवर ग्राहकांची वर्दळ नसल्याचा दावा करत कापड विक्रेत्यांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला होता. या पार्श्वभूमीवर त्यांनी थेट मुख्यमंत्री सावंत यांच्याकडे हस्तक्षेपाची मागणी केली होती. त्यानंतर पीएमसीने कापड विक्रेत्यांशी चर्चा करून पर्यायी जागेचा प्रस्ताव पुढे आणला.



नगरपालिकेच्या बैठकीत यासंदर्भातील अंतिम निर्णय घेण्यात आला. यानुसार सुमारे ४० कापड विक्रेत्यांना न्यू मार्केटमधील नव्या जागेत स्थान दिले जाणार आहे. यामुळे त्यांचा व्यवसाय पूर्ववत सुरू ठेवता येईल, अशी अपेक्षा आहे.

पीएमसी अध्यक्ष आनंद नाईक यांनी बैठकीनंतर माहिती देताना सांगितले की, शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याने नगरपालिका लवकरच एक ४० दिवसांचे नसबंदी शिबिर आयोजित करणार आहे. पशुवैद्यक आणि संस्थांच्या मदतीने सुमारे १००० कुत्र्यांची नसबंदी केली जाणार आहे. तसेच भटक्या प्राण्यांसाठी बांदोडा कोमुनिदाद मधील २००० चौ.मी. जमीन तातडीने संपादित केली जाईल.

पीएमसी च्या साफसफाई विभागासाठी राबवण्यात येणाऱ्या सोपो टेंडर'ला प्रतिसाद न मिळाल्याने विद्यमान कंत्राटदाराचा करार सहा महिन्यांनी वाढवण्यात आला आहे. दरम्यान, पालिकेने भाड्याने घेतलेल्या चार खाजगी फ्लॅट्सबाबत एक महिना थकित भाडे वसूल करण्याचाही निर्णय घेतला असून सुमारे एक कोटी रुपयांची वसुली अपेक्षित आहे.

शहरात हिरवळ वाढवण्याच्या उद्देशाने मोकळ्या जागांवर वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची सुरुवात रिव्हर फ्रंट प्रकल्पाच्या शुभारंभापासून केली जाणार आहे. तसेच, रिक्त असलेल्या जड वाहन चालकांच्या पदभरतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवण्यात येईल.

### बैठकीतले इतर महत्त्वाचे निर्णय

- झारेश्वर देवस्थानसमोरील बस स्थानक परिसरात एका गड्डाचे अतिक्रमण हटवण्याचा निर्णय.
- विशाल मेगा मार्टच्या विस्तारावर समिती अहवालानंतर लवकरच निर्णय.
- शहरात पे पार्किंग प्रणाली कार्यान्वित करण्याची तयारी अंतिम टप्प्यात.
- मासे विक्रेत्यांकडून व्यवसाय जागांचे सबलेटिंग थांबवण्यासाठी कारवाई करणे

# सफा मस्जिद परिसरात पावसाचे पाणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३ :** बांदोडा – फोंडा येथील ऐतिहासिक आणि संरक्षित सफा मस्जिद परिसरात चार पदरी महामार्गालगतच्या गटारांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने चिंता व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांनी ही बाब राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिली असून, त्वरित योग्य ड्रेनेज उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

नव्याने तयार करण्यात आलेल्या फर्मागुडी महामार्गावरून येणारे पावसाचे मोठ्या प्रमाणावरील पाणी उताराच्या दिशेने वाहून येते आणि थेट सफा मस्जिदसमोरील उतारावर साचते. परिणामी, हे पाणी मस्जिदच्या आवारात ओव्हरफ्लो होण्याची वेळ येते. या पाण्याचा त्रास मस्जिदसमोरील ऐतिहासिक बाग आणि टाकीला होत असून, त्यामुळे वास्तूच्या रचनेवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

स्थानिकांनी स्पष्टपणे सांगितले की, महामार्ग बांधताना योग्य आउटलेट वा ड्रेनेज सिस्टिमची तरतूद न केल्यामुळे हा प्रकार घडतो आहे. गटारांची क्षमता अपुरी असून, पावसाचे पाणी थेट मस्जिदच्या परिसरात झिरपत आहे.

सफा मस्जिद समितीचे अध्यक्ष मुल्ला मुर्तुझा यांनी यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याची विनंती केली आहे. त्यांनी सांगितले की, सफा मस्जिद केवळ धार्मिकच नव्हे तर ऐतिहासिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची वास्तू आहे. तिच्या रक्षणासाठी योग्य जलनिस्सारण व्यवस्था आवश्यक आहे.

या प्रकरणी स्थानिक प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून अद्याप ठोस प्रतिसाद मिळालेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. ऐतिहासिक वारसा म्हणून ओळखली जाणारी सफा मस्जिद भविष्यात पावसामुळे बाधित होऊ नये यासाठी तातडीने स्थायी उपाययोजना करणं गरजेचं असल्याचं स्थानिकांनी अधोरेखित केलं आहे.

# पैसे दुप्पट करण्याच्या आमिषाने महिलेची ऑनलाईन फसवणूक

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हार्दोळ, दि. ३ :** सोशल मीडियावर पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून म्हार्दोळ मधील एका महिलेची १.५ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी म्हार्दोळ पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

म्हार्दोळ येथील एका महिला रहिवाशाने दिलेल्या तक्रारीनुसार, २९ नोव्हेंबर २०२४ रोजी, एका अज्ञात व्यक्तीने टेलिग्राम ॲपद्वारे तिच्याशी संपर्क साधला. संबंधिताने तिला यूट्यूबवरील व्हिडिओंना लाईक, शेअर आणि सबस्क्राइब करण्याच्या सवयीच्या कामांत गुंतवणूक करून दुप्पट नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

या आश्वासनावर विश्वास ठेवून, तक्रारदार महिलेने संबंधित अज्ञात व्यक्तीच्या सांगण्यावरून एकूण १,५०,००० रुपये ऑनलाइन स्वरूपात गुंतवले. मात्र, या व्यवहारातून तिला कोणताही नफा मिळाला नाही, तसेच गुंतवलेले पैसेही परत मिळाले नाहीत. यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने म्हार्दोळ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या गुन्ह्याचा पुढील तपास म्हार्दोळ चे पोलीस निरीक्षक योगेश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावर अशा प्रकारच्या फसव्या योजनांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

# रेस्टॉरंट कर्मचाऱ्याला मारहाणप्रकरणी पाच जणांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** हणजूण येथील एका रेस्टॉरंटमधील कर्मचाऱ्याला पंखा हलवण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादात मारहाण करणाऱ्या पाच जणांना हणजूण पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये रोहित कांबळी (२३), आदित्य मानोलकर (२४), किरण पवार (२३), विक्रम चौधरी (२०)आणि किरण कांबळी (३५) यांचा समावेश असून, हे सर्वजण काणका परिसरातील रहिवासी आहेत.

तक्रारदार मनोज कुमार (२५), उत्तर प्रदेशातील बिजनौर येथील असून तो सध्या हणजूण येथील फिशरमेन व्हिलेज रेस्टॉरंटमध्ये स्वयंपाकी म्हणून कार्यरत आहे. त्याने हणजूण पोलीस स्थानकात दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच्या राहत्या खोलीबाहेर ठेवलेल्या पंख्याच्या हलवण्यावरून रोहित कांबळी व आदित्य मानोलकर यांच्यासोबत शाब्दिक वाद झाला. वाद वाढल्यानंतर दोघांनी तक्रारदाराला शिवीगाळ केली.

तक्रारीनुसार, रोहित कांबळीने लोखंडी कड्याने मनोजच्या डोक्यावर वार केला, तर आदित्यने मुठीने आणि चापट मारत मारहाण केली. या हल्ल्यामुळे तक्रारदाराच्या डोक्याला गंभीर जखम झाली व रक्तस्राव झाला. त्यानंतर अन्य तिघे किरण पवार, विक्रम चौधरी आणि किरण कांबळी देखील या हल्ल्यात सहभागी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

सदर प्रकरणाचा तपास पीएसआय नवनीत गोलतेकर करीत आहेत. आरोपींविरुद्ध संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# भर पावसात सुरू असलेल्या गटार कामामुळे नागरिक संतप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३ :** फोंडा तालुक्यातील खांडेपार ग्रामपंचायतीतील गृहनिर्माण मंडळ वसाहतीत आज सकाळी अचानक गटार खोदण्याचे काम सुरू करण्यात आल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. पावसाळ्याच्या मध्यात कोणतीही पूर्वसूचना न देता काम सुरू केल्याने स्थानिकांनी कंत्राटदारावर जोरदार संताप व्यक्त केला.



गृहनिर्माण मंडळातील रहिवासी सकाळी उठून पाहतात, तोपर्यंत मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्ता खणला गेलेला होता आणि मोठ्या खंदकामुळे अनेकांना आपापल्या फ्लॅटमध्ये पोहोचणे अशक्य झाले होते. नागरिकांनी रस्त्यावर उतरून काम थांबवण्याची मागणी केली आणि ताबडतोब खंदक पूर्ववत केला नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला.

रहिवाशांचे म्हणणे आहे की, रुंदीमध्ये सुमारे एक मीटर असलेल्या खंदकातून डोंगरातील पाणी वेगाने वाहत आहे, त्यामुळे चुकून कोणी त्यात पडल्यास गंभीर दुर्घटना होऊ शकते. लहान मुले, वृद्ध आणि महिलांसाठी हा खंदक जीवघेणा ठरू शकतो, अशी त्यांची स्पष्ट भीती आहे. तसेच, गटारासाठी ठेवण्यात आलेले पाइपही खंदकाच्या मापाशी सुसंगत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी, अशा कामामुळे परिस्थिती अधिकच बिकट होणार असल्याचा आरोप करण्यात आला.

रहिवाशांनी स्पष्टपणे सांगितले की, प्रवेशद्वार अडवून ठेवल्याने वैद्यकीय आपत्कालीन प्रसंगी बाहेर पडता येणे अशक्य झाले आहे. याशिवाय मुले शाळेला, कर्मचारी कार्यालयात किंवा नागरिक दैनंदिन गरजांसाठी घराबाहेर पडू शकत नाहीत, ही मोठी अडचण निर्माण झाली आहे.

तसेच, खंदकावर कोणताही संरक्षक कठडा नसल्यामुळे रात्रौ अपघाताची शक्यता अधिक आहे. यासंदर्भात त्यांनी कंत्राटदाराविरुद्ध पोलिस तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून खांडेपार गृहनिर्माण मंडळातील रहिवासी वारंवार साचणाऱ्या गटार पाण्यामुळे त्रस्त आहेत. तीन इमारतींच्या जवळ सतत तुंबणाऱ्या पाण्यामुळे आरोग्य धोक्यात येत आहे, आणि त्यासाठी योग्य ड्रेनेज व्यवस्थेची मागणी वारंवार करण्यात आली होती.

मात्र, पावसाळ्यात काम सुरू करणे हे अपयशाचे लक्षण आहे, असा आरोप स्थानिकांनी केला. कंत्राटदाराने स्थानिकांची माहिती आणि सहकार्य न घेता काम सुरू केले, यामुळे आम्हाला दुहेरी त्रास सहन करावा लागतोय, असे एका रहिवाशाने सांगितले.

स्थानिकांनी पंचायत आणि सार्वजनिक बांधकाम खात्याकडे तातडीने हस्तक्षेप करून खंदक बंद करणे, प्रवेशद्वार सुरळीत करणे आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्याची मागणी केली आहे. तसेच, पुढील कोणतेही काम स्थानिकांशी चर्चा करून, योग्य हवामान लक्षात घेऊनच सुरू करण्यात यावे, असा आग्रह धरला आहे.

# एस्टीवन डिसोझा प्रकरणात मोठी कारवाई: ईडीकडून ६० कोटींच्या मालमत्ता जप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** पणजी विभागीय कार्यालयातील अंमलबजावणी संचालनालयाने मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए ), २००२ अंतर्गत गोव्यातील मोठ्या जमीन घोटाळ्याशी संबंधित कारवाईत रु. ६०.०५ कोटींच्या स्थावर मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त केल्या आहेत. हा तपास एस्टेवन डिसोझा व इतरांविरोधात सुरू असून, ही मालमत्ता त्यांच्या आजी रोझा मारिया डिसोझा यांच्या नावावर असल्याचे समोर आले आहे.

ही कारवाई ८ नोव्हेंबर २०२३ रोजी झालेल्या ११.८२ कोटींच्या आधीच्या जप्तीव्यतिरिक्त असून, ती जप्ती निर्णय प्राधिकरणाने ८ एप्रिल २०२४ रोजी वैध ठरवली होती. यामुळे एकूण जप्तीची रक्कम ७० कोटी रुपयांच्या आसपास पोहोचली आहे. ईडीच्या तपासात उघड झाले की, गोव्यातील बार्देश तालुक्यातील पिळर्ण गावातील जमिनी बनावट विक्री कागदपत्रे आणि फर्जी प्रतिज्ञापत्र सह ना-हरकत प्रमाणपत्रे वापरून मिळवण्यात आल्या. या प्रक्रियेमध्ये फसवणूक, बनावटगिरी आणि मालमत्ता हस्तांतरणाचा गैरवापर झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

गोवा पोलिसांनी यापूर्वीच एसटीवन डिसोझा आणि इतरांविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० च्या विविध कलमांनुसार एफआयआर दाखल केले होते. या एफआयआर च्या आधारेच ईडीने मनी लॉँडरिंगचा स्वतंत्र तपास सुरू केला.

ईडीच्या निवेदनानुसार, एस्टेवन डिसोझा यांनी मोहम्मद सुहेल व इतरांसह संगनमत करून जमिनीचे मालकी कागदपत्रे बनावट केली आणि विक्री करारांमध्ये फेरफार करून मालमत्तांवर बेकायदेशीर नियंत्रण मिळवले. नंतर, या बेकायदेशीर व्यवहारांना वैधतेचा मुलामा देण्यासाठी बनावट कागदपत्रे खऱ्या दस्तऐवजांप्रमाणे अधिकृत संस्थांकडे सादर करण्यात आली. ईडीने म्हटले की, या प्रकरणात डिसोझा यांची भूमिका केवळ सक्रियच नव्हे, तर ती एक संघटित फसवणूक योजनेचा भाग होती. यामुळे फसवणूक करून मिळवलेली रक्कम पांढरपेशांमध्ये रूपांतरित करण्याचा मनी लॉँडरिंगचा गुन्हा बनतो.

# भाडेकरू पडताळणी अनिवार्य असली तरी घरमालक चिंतेत

## दक्षिण गोव्यात भाड्याच्या खोल्यांतील आत्महत्या वाढल्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** दक्षिण गोव्यातील भाड्याच्या खोल्यांमध्ये आत्महत्या आणि गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे घरमालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गोवा भाडेकरू पडताळणी कायदा २०२४ अंतर्गत भाडेकरूंची तपासणी बंधनकारक असूनही, अलीकडील घटनांनी परिसरात अस्वस्थता पसरली आहे.

गेल्या तीन महिन्यांत कोलवा , कुंकळ्ळी , कुळे , साकोर्डा आणि इतर भागांत भाड्याने राहणाऱ्या व्यक्तींच्या आत्महत्येच्या घटना नोंदवण्यात आल्या आहेत. या घटनांमध्ये उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि कर्नाटकसारख्या राज्यांतील स्थलांतरित नागरिकांचा मोठा सहभाग आहे. एका प्रकरणात झारखंडमधील १६ वर्षीय विद्यार्थ्याने कोलवा येथे आत्महत्या केली. या घटनांमुळे फक्त घरमालकच नव्हे तर स्थानिक पोलिस प्रशासनही सतर्क झाले आहे.



भविष्यातील धोके आणि गैरकृत्ये टाळण्यासाठी दक्षिण गोवा पोलिसांनी भाडेकरू पडताळणी मोहीम तीव्र केली आहे. २४ जून २०२५ पर्यंत पोलिसांनी ३०,३९३ भाडेकरूंची पडताळणी केली आहे. वेर्णा पोलिसांनी सर्वाधिक ६१५५, तर फोंडा (३८३७), कोलवा (२७१९), मायना कुडतरी (२८०३), मडगाव (१५५७), कुंकळ्ळी (१७६८), फातोर्डा (१६६८), कुडचडे (१७३०), वास्को (२६९५), म्हार्दोळ (२१७७), केपे (६७९), सांगे (८०९), काणकोण (१०११), मुरगाव (४७९) आणि कुळे (३०६) या पोलीस ठाण्यांनीही भाडेकरूंची तपासणी केली आहे.

कोलवा येथील घरमालक लक्ष्मण नाईक यांनी सांगितले की, भाडेकरू पडताळणीमुळे काही प्रमाणात सुरक्षितता वाढली असली तरी आत्महत्येच्या घटनांनी नव्याने चिंता निर्माण झाली आहे. ते पुढे म्हणाले, काही वेळा भाडेकरू चुकीची माहिती देऊन इमारतीचे मालक असल्याचे भासवतात आणि खोल्या भाड्याने देतात. हे आर्थिक फसवणुकीसह मालमत्तेच्या जोखमीचे कारण ठरते.

दुसरे घरमालक जस्यंत पेडणेकर यांनीही भाडेकरू पडताळणीचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, गोवा भाडेकरू पडताळणी कायद्यामुळे घरमालकांना पार्श्वभूमी तपासणीस मदत होते. मात्र, पर्यटक आणि स्थलांतरितांची संख्या वाढल्यामुळे मालकांमध्ये धास्ती आहे.

ॲड. विनय पार्कर यांनी स्पष्ट केले की, जर मालकाने भाडेकरूची पडताळणी केली नाही आणि त्या भाडेकरूचा गुन्ह्यात सहभाग आढळला, तर मालकालाच जबाबदार धरले जाऊ शकते. त्यांनी सांगितले की, कायद्यानुसार पडताळणी न केल्यास संबंधित व्यक्तीवर १०,हजार रुपयांचा दंड आकारला जाऊ शकतो.

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, भाड्याने खोल्या देणे हा निश्चितच फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो, परंतु कायद्याचे पालन न केल्यास तो मालकासाठी मोठ्या संकटाचे कारण ठरू शकतो. स्थलांतरित नागरिकांमध्ये भाड्याच्या घरांची मागणी वाढत असल्यामुळे घरमालकांनी आवश्यक खबरदारी घेतली पाहिजे, असे त्यांनी सूचित केले.

